पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) ( Formerly Solapur University)
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०

जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/२०१९/१४४१ दि. 11 SEP 2019

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय : सर्व विद्याशाखेच्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज अतिविलंब स्वीकारण्याच्या तारखाबाबत...**

**संदर्भ :** विद्यापीठ कार्यालयाचे परिपत्रक क्र. ८९/२०१९, दि. १६/०८/२०१९

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाव्दारे ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१९ या सत्र हंगामातील सर्व विद्याशाखेच्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा व परीक्षा शुल्काचा तक्ता कळविण्यात आला होता. परंतु, सर्व विद्याशाखेच्या रिपीटर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विलंब शुल्काची मुदत संपल्यानंतर अतिविलंबाने स्विकारण्याबाबत **परीक्षा मंडळाच्या दि.०४/०३/२०१५ रोजीच्या बैठकीतील ठराव** खालीलप्रमाणे आहे.

पुर्वीच्या परीक्षा शुल्काच्या परिपत्रकानुसार प्रति दिन दंड आकारल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड बसत होता. याचा विचार करता, अतिविलंब शुल्काचा कॉलम काढून टाकण्यात यावा व तो सूचनांच्या स्वरुपात नमूद करण्यात यावा. तसेच अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज सादर करण्याचा कालावधी हा विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखेनंतर ५ दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- असे राहील.

**(अ)** त्यानंतर ५ दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- + रु.५००/- असे राहील.

**(ब)** त्यानंतर परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० दिवसापर्यंत परीक्षा फी + विलंब शुल्क रु.५०/- + अतिविलंब शुल्क रु.३००/- + रु.१०००/- असे राहील.

**(क)** परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० दिवसा पर्यंतच परीक्षा अर्ज स्वीकारले जातील त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **[सर्व सुटटीचे दिवस वगळून]**

वरील प्रमाणे कार्यवाही करुन परीक्षा अर्ज विद्यापीठास सादर करावे.

**आपला विश्वासू,**

**(उपकुलसचिव)**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**